जिल्हा शल्यचिकीत्सक, यांचे कार्यालय,धुळे
दुरध्वनी क्र.(कार्यालय)०२५६२-२४०५७४ E-mail-dhulecsmedstore@gmail.com

आरोग्य सेवा

जाक्र/जिरुधु/अवैभो/दरपत्रके/ओवसाहित्य/ 6017-20 /२०२६
जिल्हा शल्यचिकित्सक, यांचे कार्यालय, धुळे
दिनांक :- 06/10/2026

प्रति,
1).................................
2).................................
3).................................

**विषय** :- जिल्हा रुग्णालय, धुळे येथे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता संगणक प्रिंटर, स्कॅनर, इंटरनेट सुविधा आवश्यक साधनसामुग्रीचे दर निश्चित करण्याकरीता दरपत्रके मागविणे बाबत...

**संदर्भ**:- या कार्यालयाची मंजुर टिप्पणी दिनांक

जिल्हा रुग्णालय, धुळे येथे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता संगणक प्रिंटर, स्कॅनर, इंटरनेट सुविधा आवश्यक साधनसामुग्रीचे दर निश्चित करण्याकरीता वार्षिक दर निश्चित करुन आवश्यकतेनुसार खरेदी व संगणकाची कामे करावयाची आहेत. तरी इच्छुक पुरवठादारानी सोबत दिलेल्या य आवश्यक साधनसामुग्रीचे दरपत्रके आपल्या लेटर हेडवर आपल्या सही नीशी स्वच्छ अक्षरात खाडाखोड शिवाय विहीत नमुन्यातील दरपत्रके दि. 6/10/२०२६ ते 13/10/२०२६ पर्यंत या कार्यालयास स्वहस्ते/दुतामार्फत/पोस्टाने कार्यालयीन वेळेत (सुटीचा दिवस सोडून) दुपारी ५.०० वाजेपर्यत सादर करावीत. त्यानंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही. दिनांक 14/10/२०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता दरपत्रके उघडण्यात येतील. त्यावेळेस आपण उपस्थित राहावे.

**दरपत्रके पाठविण्याच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.**

१) स्बंधित पुरवठा धारकाने दरपत्रकांवरील नमुद केलेल्या दरांमध्ये खाडाखोड अथवा अंक गिरविलेले नसावेत.
२) दरपत्रकामध्ये जीएसटी तसेच पॅन नंबर इ. नमुद करणे व सदर प्रत जोडणे बंधनकारक राहील. यानुसार पुरवठादारांचे दरपत्रक ग्राहय धरण्यात येईल अन्यथा रद्द करण्यात येईल.
३) संबंधित पुरवठा धारकांकडुन प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्यात येईल, अन्यथा नाकारण्यात येतील. त्यानुसार पुरवठादारांचे दरपत्रक ग्राहय धरण्यात येईल अन्यथा रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
४) उपरोक्त नमुद केल्यानुसार न्युनत्तम पुरवठाधारकाकडुन पुरविण्यात येणा-या सेवेमुळे कार्यालयीन कामकाजाचा खोळंबा झाल्यास अथवा सेवा असमाधानकारक वाटल्यास कोणत्याही क्षणी न्युनत्तम पुरवठा दारास देण्यात आलेले सदरचे वार्षिक पुरवठा आदेश तात्काळ रद्द करण्याचे व नवीन पुरवठा आदेश निर्गमीत करण्याचे संपूर्ण अधिकार हया कार्यालयाचे राहतील व नंतर कोणत्याही सबब व तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची नोंद संबंधित पुरवठादार यांनी घ्यावी.
५) संगणक, प्रिंटर, स्कॅनर, इंटरनेट सुविधा मध्ये काही तांत्रीक बिघाड झाल्याने कोणत्याही वेळेस कार्यालयाने कळविले नंतर आपले कडील इंजिनिअर १ तासाच्या आत आवश्यकतेनुसार जिल्हा रुग्णालयाच्या विविध विभागात येऊन सदर बिघाड दुरुस्त करुन देणे बंधनकारक राहील.

६) संगणक, प्रिंटर, स्कॅनर, इंटरनेट सुविधा व सोबत जोडलेल्या तपशिलानुसार नमुद साधनसामुग्री इ. करीता दरपत्रकामध्ये नमुद करण्यात येणारे दर हे बाजारभावानुसार असणे बंधनकारक राहील. नसे आढळुन न आल्यास पुरवठा दाराचे दरपत्रक रद्द ठरवण्यात येईल. याची कटाक्षाने दखल घ्यावी.

७) उपरोक्त करार हा १ वर्षासाठी करण्यात येईल. तथापी सदरच्या काळामध्ये न्युनत्तम पुरवठादार उपरोक्त तक्ता मध्ये नमुद आवश्यकतेनुसार साधनसामुग्रीचा पुरवठा इ. कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात येईल याची नोंद घ्यावी. नंतर कोणत्याही प्रकारची तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. सदर साधनसामुग्रीचा पुरवठा कार्यालयाकडुन दुरध्वनीद्वारे मागणी करण्यात आलेनंतर २ तासात किंवा जास्तीत जास्त एक विसाचे आंत विहीत कालावधीमध्ये कार्यालयास उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील तसेच खरेदी करण्यात येणा-या साधनसामुग्रीचे देयके चलनासहीत वेळेच्या वेळी कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील.

८) सदर पुरविण्यात आलेली साधनसामुग्री व सेवेबाबत १ वर्ष वॉरंटी असणे बंधनकारक अथवा त्यानंतर मोफत सेवा पुरविणे बंधनकारक राहील.

९) सोबत जोडलेल्या तपशिलानुसार कार्यालयाने आवश्यकतेनुसार संबंधित पुरवठा धारकाकडुन पुरविण्यात येणारे पार्टस ओरीजनल असणे बंधनकारक आहे. सदर पार्टस डयुप्लीकेट असल्याचे आढळुन आल्यास सदर पुरवठाधारकाबरोबर करण्यात आलेले वार्षीक करार तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर पुरवठा धारकाचे नाव काळया यादीत टाकण्यात येईल.

१०)संबंधित पुरवठा धारकाकडुन ज्या ठिकाणी कार्यालयातील संगणक, प्रिंटर, स्कॅनर इ. दुरुस्ती करीता घेऊन जाणे आवश्यक असल्यास १ दिवसापेक्षा जास्त काळ ठेऊन घेण्यात येऊ नये.

११)कार्यालयात विहीत कालावधीत प्राप्त झालेली देयके नियमाप्रमाणे व अनुदानाच्या उपलब्धेतुनुसार अदायगी करण्यात येईल.

१२)अनुभव प्रमाणपत्र व कार्यालयीन आदेश असल्यास जोडण्यात यावे.

१३)दरपत्रके ही सिलबंद पाकिटातून पाठविण्यात यावे.

१४)साहित्य **Good Quality** देणे बंधनकारक राहील.

१५)वर नमुद केलेल्या यादीत कोणताही बदल करण्यात येऊ नये किंवा अनुक्रमांक बदलण्यात येऊ नये असे आढळल्यास दरपत्रके रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१६)दुकानाचे शॉप ॲक्टप्रमाणे नोंदणी पत्रकाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

१७)व्यवसायाच्या व्याप्तीनुसार GST क्रंमाक व नोदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक.

१८)दरपत्रकामध्ये नमुद केलेले दर हे उपलब्ध बाजार भावापेक्षा किंवा इतर जिल्हयात किंवा इतर ठिकाणी सादर केलेल्या दरापेक्षा जास्त नसावे.

१९)आयकर,व्यवसाय कर तसेच नियमानुसार जे शासकिय कर लागू असतील ते सर्व भरण्याची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहिल. तसेच देयकातून नियमानुसार TDS कपात करण्यात येईल.

२०)आपल्या संस्थेचे या कार्यालयातील कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचारी यांचेसोबत हितसंबंध नाही याबाबतचे प्रमाणपत्र दरपत्रकासोबत सादर करावे.

२१) आपल्या संस्थेने /कंपनीने एकच निविदा भ रल्याचे एकल निविदाबाबतचे हमीपत्र सोबत सादर करणे बंधनकारक राहील.

२२) कोणतेही कारण न देता दरपत्रके मंजूर करावयाची अथवा नाकारण्याचा अधिकार किंवा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित ठेवण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक स्त्री रुग्णालय,धुळे यांनी राखून ठेवला आहे. त्यासाठी कोणतेही तोंडी अथवा लेखी कारण दिले जाणार नाही.

(डॉ. रविंद्र प्र. सोनवणे)
जिल्हा शल्यचिकित्सक, धुळे

| SR No | Items Name |
|---|---|
| 1 | Desktop/Laptop Repairing C |
| 2 | Printer Reapairing Charges |
| 3 | Toner Refilling Charges 12a |
| 4 | Toner Drum12a/88a/Broth |
| 5 | Dr/per Blade |
| 6 | Brother Orignal Toner Cart |
| 7 | HP/Canon Toner Cartridge |
| 8 | Brother Drum Unit(Origin |
| 9 | 4gb ddr3/4desktop/lapto |
| 10 | 8gb ddr3/8gb ddr4 ram d |
| 11 | Antivirus QuickHeal Pro |
| 12 | Antivirus QuickHeal Pro |
| 13 | Antivirus QuickHealTota |
| 14 | Usb wired kbd lapcare/ |
| 15 | Usb kbd hp/delt/tvs |
| 16 | Wired mouse branded |
| 17 | Wireless combo branc |
| 18 | Printer cable 1.5mtr/ |
| 19 | Printer Teflon canon/ |
| 20 | Printer pressure/pick |
| 21 | 400W smps |

| SR No | Items Name | QTY | Rate |
|---|---|---|---|
| 1 | Desktop/Laptop Repairing Charges | 1 | |
| 2 | Printer Reapairing Charges Regular | 1 | |
| 3 | Toner Refilling Charges 12a/88a/Brother/Samsung | 1 | |
| 4 | Toner Drum12a/88a/Brother | 1 | |
| 5 | Dr/per Blade | 1 | |
| 6 | Brother Orignal Toner Cartridge b021 | 1 | |
| 7 | HP/Canon Toner Cartridge oem/Compatible | 1 | |
| 8 | Brother Drum Unit(Original) | 1 | |
| 9 | 4gb ddr3/4desktop/laptop ram | 1 | |
| 10 | 8gb ddr3/8gb ddr4 ram desktop/laptop | 1 | |
| 11 | Antivirus QuickHeal Pro lyr/NP Av ts lyr | 1 | |
| 12 | Antivirus QuickHeal Pro lu 3yr/NP Av | 1 | |
| 13 | Antivirus QuickHealTotal Security lu 3yr/NP Av | 1 | |
| 14 | Usb wired kbd lapcare/coco/intex | 1 | |
| 15 | Usb kbd hp/delt/tvs | 1 | |
| 16 | Wired mouse branded | 1 | |
| 17 | Wireless combo branded | 1 | |
| 18 | Printer cable 1.5mtr/3mtr | 1 | |
| 19 | Printer Teflon canon/hp | 1 | |
| 20 | Printer pressure/pickup roller canon/HP | 1 | |
| 21 | 400W smps | 1 | |